२

# जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील काळेवाडी फाटा व देहू आळंदी रस्त्यापर्यंत रस्ता बी.आर.टी.एस. कॉरिडॉर म्हणून विकसित करणेत आलेला आहे. या रस्त्यामधील काळेवाडी पवना नदी ते चिंचवड लिंकरोड व पुणे मुंबई लोहमार्ग व महामार्ग यांना ओलांडुन ऑटोक्लस्टर बाजूकडे उतरणारा उड्डाणपुल बांधणेत आला आहे. या उड्डाण पुलावरून चिंचवड लिंकरोड येथे उतरण्यासाठी व चढण्यासाठी रँम्प / लुप बांधणे आवश्यक आहे. सदर रँम्प/ लुप बांधल्यास चिंचवड येथील नागरिकांना मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे. तसेच यामुळे पिंपरी कँम्प रिव्हर रोड या ठिकाणी सध्या होणारी वाहतुक काही कमी होण्यास मदत होईल. सदर रँम्प / लुपसाठीचे जागेचा मंजूर विकास योजनेमध्ये तरतुद नाही. त्यामुळे सदर रँम्प / लुपसाठी आवश्यक जागेसाठी मौजे चिंचवड येथील स.नं. २६४, २६६, २६५ मधील क्षेत्रावर ४५ मी मंजूर विकास योजना रस्त्याचे दोन्ही बाजुस सोबतचे नकाशात लाल रंगाने दर्शविलेप्रमाणे चढणे व उतरणेसाठी रँपसाठीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २०५ नुसार रस्ता घोषीत करणेकामी मा. ब प्रभाग समिती सभा ठराव क्र. १९, दि. ०७/०८/२०१८ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. व मा. आयुक्त यांना प्राप्त अधिकारानुसार मौजे चिंचवड येथील स नं २६४पै, २६५पै व २६६पै मधुन जाणा-या ४५ मी मंजूर विकास योजना रस्त्याचे दोन्ही बाजुस सोबतचे नकाशात लाल रंगाने दर्शविलेप्रमाणे चढणे व उतरणेसाठी रँपसाठीचा रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम २०५ अंतर्गत १८.०० मी रूंदीचा मनपा रस्ता घोषित करण्याचा इरादा जाहिर केलेला आहे.

सदर घोषित करावयाच्या रस्त्याचा आराखडा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागात उपलब्ध करण्यात आलेला आहे. याबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत/ सूचना असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत आवश्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात द्यावी. सदर मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/ सूचनांवर योग्य तो विचार करून इराद्याप्रमाणे म्युनिसिपल रस्ता घोषित करण्यात येईल. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकत/ सूचना विचारात घेतली जाणार नाही.

स्थळ – पिंपरी, पुणे
दिनांक ~~२४/०९/२०१८~~
११/ ९/२०१९
जाहिरात क्रमांक ११६

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

३१९